प्रेस नोट

विवा महाविद्यालयात उत्साहात साजरा झाला मराठी राजभाषा दिन

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जाहल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा

अशा या मायमराठीच्या गौरवाचा सोहळा आज विवा महाविद्यालयात रंगला होता. मराठी राजभाषा दिनाचं औचित्य साधून विवा महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळातर्फे ग्रंथदिंडीचं आयोजन आज करण्यात आलं होतं. नवीन महाविद्यालयाच्या प्रांगणातून निघालेल्या या ग्रंथदिंडीत भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, बायबल, कुराण आणि कुसुमाग्रजांचे नटसम्राट यांचा समावेश करून सर्वधर्मसमभावाचा एक आगळा वेगळा आदर्श घालून देण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविकिरण भगत यांच्या हस्ते पूजन झाल्यानंतर जुन्या महाविद्यालयाच्या दिशेनं ही दिंडी रवाना झाली. पारंपरिक वेशभूषा केलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या बरोबरीनं महाविद्यालयाचे प्राचार्य, लेझीम पथक आणि शिक्षकवर्गही या दिंडीत सहभागी झाले होते. याशिवाय कुसुमाग्रजांच्या साहित्यकृतींचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले.

विवा महाविद्यालयाच्या ग्रंथालयातर्फेही मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने ३दिवसीय ग्रंथप्रदर्शनाचं आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटनही प्राचार्य डॉ. रविकिरण भगत यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथालयातर्फे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात आलेल्या मराठी हस्ताक्षर स्पर्धेच्या विजेत्यांना पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याशिवाय ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला.

डॉ. रविकिरण भगत
प्राचार्य, विवा महाविद्यालय
यांच्या कार्यालयातून


मराठी
राजभाषा
दिन




FLOOR PLAN
FLOOR PLAN
मी मराठी